**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २७९ । गुरुवार ६ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322





जिल्हा पोलिस दलाच्या वतीने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी पोलीस मुख्यालय येथील मैदानावर व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली तसेच यावेळी जनजागृतीपर रॅली काढण्यात आली याचा शुभारंभ विधान परिषदेचे सभापती ना .प्रा राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला .समवेत पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील ,आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार काशिनाथ दाते ,जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया .जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे ,मुख्य आयोजक जिल्हा पोलीस अधीक्षक मु मक्का सुदर्शन , उपमहापौर धनंजय जाधव ,निखिल वारे ,प्रिया जानवे आदी उपस्थित होते. (छाया- राजू खरपुडे ,नगर)

# सीसीएमपी नोंदणी प्रस्तावाविरोधात आयएमएचा एल्गार

## आपत्कालीन सेवांसह वैद्यकीय सेवा बंदचा इशारा । अहिल्यानगरात सिव्हिल हॉस्पिटल ते जिल्हाधिकारी कार्यालयावर डॉक्टरांचा मोर्चा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या हाकेला प्रतिसाद देत अहिल्यानगर शाखेच्या वतीने गुरुवारी सिव्हिल हॉस्पिटल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार किरण बेरड यांना निवेदन देऊन शासनाने हा प्रस्ताव तातडीने मागे घ्यावा, अन्यथा आपत्कालीन सेवांसह सर्व वैद्यकीय सेवा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी च्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पूर्ण केलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याचा प्रस्ताव आधुनिक वैद्यकशास्त्राची गुणवत्ता, वैज्ञानिक आधार आणि वैद्यकीय व्यवसायाची विश्वासार्हता धोक्यात आणणारा आहे. या निर्णयामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेवर आणि सार्वजनिक आरोग्यावर दूरगामी परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. शासनाकडे वारंवार निवेदने, पत्रव्यवहार आणि पत्रकार परिषदांद्वारे भूमिका मांडूनही समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याने हे आंदोलन हाती घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या निर्णयानुसार दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पुढील सूचना मिळेपर्यंत आपत्कालीन सेवांसह वैद्यकीय सेवा अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

मोर्चामध्ये आयएमए अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिव डॉ. अमित करडे, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. निसार शेख, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ. सी. डी. मिश्रा, डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. सागर झावरे, डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. प्राजक्ता पारदे, डॉ. विजय पाटील, डॉ. अभिजित पाठक, डॉ. एस. एस. दीपक, डॉ. वसंत कटारिया, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. पांडुरंग डौले, डॉ. राहुल पंडित, डॉ. पोपट कर्डिले, डॉ. कृष्णा बलदवा, डॉ. अर्जुन शिरसाट यांच्यासह शहर व जिल्ह्यातील मोठ्या संख्येने डॉक्टर सहभागी झाले होते.

# तोफखाना व एमआयडीसी हद्दीतील मावा व सुगंधी तंबाखूवर एलसीबीची धाड

## आठजणांवर गुन्हे । २३ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शहरातील तोफखाना आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकून अवैध सुगंधी तंबाखू व मावा तयार करून विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाईत २३ लाख २९ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ८ आरोपींवर तीन वेगळे गुन्हे दाखल केले आहेत.

शुभम दत्तात्रय हजारे (वय २९, रा. केडगाव) आणि जितू मालपाणी (रा. छत्रपती संभाजीनगर), आदित्य अरुण सुतार (वय २०), प्रमोद शरद गायकवाड (वय २०), गणेश बाळासाहेब कोलते (वय २३, तिघे रा. बोल्हेगाव) व कय्युम अयुब शेख ■ पान ४ वर




# जादा परताव्याच्या आमिषाने गुंतवणूकदारांची फसवणूक, पुणे विमानतळावरून जोडपे ताब्यात

## तोफखान्यात दाखल गुन्ह्यात एलसीबीची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुंतवणुकीवर ५ ते १५ टक्के आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची करोडो रुपयांची फसवणूक करणाऱ्या २ मुख्य आरोपींना नगरच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पुणे विमानतळावरून नाट्यमयरीत्या अटक केली. राहुल दर्शन जगताप (वय ४४) आणि पायल पी. सॅन्युअल उर्फ पायल राहुल जगताप (वय ४०, रा. एनआयबीएम, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ■ पान ४ वर



### सराईत दोघांवर दहा गुन्हे

या आरोपी जोडप्यावर अहिल्यानगरसह मुंबई, ठाणे, दिल्ली आणि हरियाणा, मध्य प्रदेश राज्यांत फसवणुकीचे तब्बल १० गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास अहिल्यानगर आर्थिक गुन्हे शाखा करत आहे.

### पसार होण्याच्या तयारीत असताना रचला सापळा

आरोपी विमानाने पसार होण्याच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती मिळताच, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, शाहीद शेख, फुरकान शेख, दीपक जाधव आणि चिमा काळे यांच्या पथकाने पोलिसांनी पुणे विमानतळ पोलिसांच्या मदतीने सापळा रचून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

# जिल्ह्यात अवैध धंद्यांवर एलसीबीची धडक कारवाई

## दहा ठिकाणी छापे टाकत पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधात जिल्ह्यात धडक मोहीम राबवत जामखेड, सुपा, एमआयडीसी आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापे टाकले. या कारवाईत अवैध दारू, जुगार आणि बंदी असलेला मावा विक्री करणाऱ्या ठिकाणांवर कारवाई करत एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले असून, २ लाख ९७ हजार २६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना दिले होते. त्यानुसार ■ पान ४ वर





# उद्योजकांच्या प्रत्येक प्रश्नावर तातडीने कारवाई होईल - डॉ. पंकजा आशिया

## एमआयडीसीतील कचरा, वीज व ईएसआयसी रुग्णालयाच्या प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांचा ॲक्शन मोड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आमी संघटनेच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांच्या उपस्थितीत उद्योजक संवाद बैठक पार पडली. या बैठकीत एमआयडीसी परिसरातील कचरा व्यवस्थापन, वीजपुरवठा, ईएसआयसी रुग्णालय उभारणी, पाणीपुरवठा, औद्योगिक सुविधा तसेच विविध प्रलंबित प्रशासकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्योजकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीच्या प्रारंभी आमी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही बैठक केवळ औपचारिक नसून उद्योग क्षेत्र आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी एमआयडीसीतील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून त्यामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत.असल्याचे निदर्शनास आणून दिले. काही ठिकाणी कचरा साचणे, सांडपाणी तुंबणे आणि दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच एमआयडीसीमध्ये ईएसआयसी रुग्णालय उभारणीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून हजारो कामगारांच्या दृष्टीने तो अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी प्रशासनाच्या सहकार्यामुळे एमआयडीसीतील रस्ते, पथदिवे आदी काही प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त करत उर्वरित प्रश्नांवरही तितक्याच वेगाने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. बैठकीत उद्योजकांनी नवीन उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या सीएनजी गॅस मीटरची कमतरता, तसेच भविष्यात अपुरा पडणारा वीजपुरवठा तसेच पाणीपुरवठ्याच्या अडचणी मांडल्या. अनेक उद्योग सुरू होण्यास तयार असून मूलभूत सुविधांच्या अभावामुळे गुंतवणूकदारांना अडचणींचा सामना करावा ■ पान ४ वर

# लक्ष्मी यात्रा उत्सवाची पोतराजासह शहरात रंगली मिरवणूक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आषाढ महिन्यानिमित्त शहरातील काटवण खंडोबा रोड येथील गाडळकर मळा परिसरात पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पारंपरिक लक्ष्मीआई यात्रा उत्सव यंदाही मोठ्या भक्तिभाव आणि उत्साहात साजरा करण्यात आला. भंडाऱ्याची उधळण, पारंपरिक वाद्यांचा गजर, पोतराजांचा सहभाग आणि ''लक्ष्मीआईच्या नावानं चांगभलं''च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

यात्रेच्या मिरवणुकीचा शुभारंभ पाचारणे कुटुंबीयांच्या हस्ते व गुरुवर्य रमाई यांच्या आशीर्वादाने नारळ वाढवून करण्यात आला. यानंतर घोड्यांच्या आकर्षक बग्गीत विराजमान असलेल्या लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि पोतराजांच्या उपस्थितीत निघालेल्या या मिरवणुकीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

मिरवणुकीत भाविकांनी भंडाऱ्याची उधळण करत लक्ष्मीमातेचा जयघोष केला. भक्तीमय वातावरणात युवकांनी भक्तिगीतांच्या तालावर ठेका धरत उत्सवाचा आनंद लुटला. पारंपरिक वाद्यांच्या गजरामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ही शोभायात्रा काटवण खंडोबा रोड, आयुर्वेद कॉलेज चौक, वाडिया पार्क, माळीवाडा मार्गे माळीवाडा येथील लक्ष्मीमाता मंदिरात पोहोचली. मंदिरात धार्मिक विधी व आरतीनंतर मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

यावेळी मिरवणुकीत हिराबाई रमेश पाचारणे, विकास पाचारणे, कविता पाचारणे, आलका पाचारणे, कुणाल पाचारणे, उज्वला खंडागळे, अंजली कापसे, राजू पाचारणे आदींसह युवक, महिला व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या लक्ष्मीआई यात्रेला सुमारे २० ते ३० वर्षांची परंपरा लाभली आहे. धार्मिक परंपरा, लोकसंस्कृती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविणारा हा यात्रा उत्सव परिसरातील नागरिकांसाठी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### फिरोदिया शिवाजियन्सच्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत रंगला चुरशीचा थरार



**अहिल्यानगर - फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) विविध वयोगटांतील सामने अत्यंत चुरशीचे आणि रंगतदार झाले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आर्मी स्कूल, ऑर्चिड स्कूल आणि सेंट मायकल स्कूलच्या संघांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. तर १६ वर्षांखालील मुलांच्या गटातील सेंट मायकल व तक्षिला स्कूल यांच्यातील सामना अखेर २-२ अशा बरोबरीत सुटल्याने उपस्थित प्रेक्षकांना अखेरच्या क्षणापर्यंत रोमांचकारी फुटबॉलचा अनुभव मिळाला. सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी स्कूल (एमआयसी अ‍ॅण्ड एस) आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यात सामना झाला. सामन्याच्या तिसऱ्या मिनिटाला पलक सोनानिया हिने आर्मी स्कूलसाठी गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आर्मी स्कूलच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत ऊर्जा गुरुकुलला अखेरपर्यंत एकही गोल करू दिला नाही. त्यामुळे आर्मी स्कूलने १-० अशा फरकाने विजयाची नोंद केली. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात जेएसएस गुरुकुल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यातील सामना जेएसएस गुरुकुलचे खेळाडू नियोजित वेळेत मैदानावर उपस्थित न राहिल्याने खेळविण्यात आला नाही. नियमानुसार ऑर्चिड स्कूलला विजयी गुण प्रदान करण्यात आले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात ज्ञानसंपदा स्कूल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यात अत्यंत रंगतदार सामना झाला. सामना शेवटपर्यंत अटीतटीचा राहिला. २१ व्या मिनिटाला मोक्ष गरदास याने गोल करत ज्ञानसंपदा स्कूलला आघाडी मिळवून दिली. मात्र ऑर्चिड स्कूलने जोरदार पुनरागमन केले. ३० व्या मिनिटाला पार्श बंब याने गोल करत सामना बरोबरीत आणला, तर ३३ व्या मिनिटाला पुन्हा गोल झळकावत संघाला आघाडी मिळवून दिली. ज्ञानसंपदा स्कूलला आणखी गोल करू न देता ऑर्चिड स्कूलने २-१ अशा फरकाने शानदार विजय मिळवला. दुपारच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि तक्षिला स्कूल यांच्यात सामना झाला. सेंट मायकल स्कूलच्या सारांश बोरा याने १९ व्या मिनिटाला, तर युग कांकरिया याने २५ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. तक्षिला स्कूलला एकही गोल करण्याची संधी न देता सेंट मायकल स्कूलने २-० असा एकतर्फी विजय मिळवला.**

# पोलीस अंमलदार तेजस्विनी बोबडे एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण; पीएसआय पदावर निवड

**श्री महालक्ष्मी मित्र मंडळ, कल्याण रोडच्या वतीने गौरव; शेतकरी कुटुंबातील कन्येच्या यशाचा सन्मान**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर शेतकरी कुटुंबातील कन्या तेजस्विनी कल्याण बोबडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची () परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस उपनिरीक्षक () पदावर निवड मिळवली आहे. सध्या त्या गेल्या आठ वर्षांपासून महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत असून नोकरी सांभाळत त्यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल श्री महालक्ष्मी मित्र मंडळ, कल्याण रोड यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभास सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. युवराज शिंदे, शेषराव आडोळे, बाबासाहेब आंधळे, सोपानराव रोकडे, शंकर बोरुडे, गणेश बेरड, निकिता बेरड, राजू पाडळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अ‍ॅड. युवराज शिंदे म्हणाले की, आजच्या काळात मुली प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. शिक्षण, प्रशासन, पोलीस सेवा आणि स्पर्धा परीक्षांमध्ये मुली उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. शेतकरी कुटुंबातील तेजस्विनी बोबडे यांनी नोकरीची जबाबदारी सांभाळत अभ्यासात सातत्य ठेवले आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होत पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड मिळवली. त्यांचे हे यश अनेक तरुण–तरुणींना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस श्री महालक्ष्मी मित्र मंडळाच्या वतीने शुभेच्छा देत त्या समाजाभिमुख आणि जनतेच्या हिताचे कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना तेजस्विनी बोबडे म्हणाल्या की, पोलीस खात्यातील नोकरी सांभाळत नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि कुटुंबाच्या पाठबळामुळे एमपीएससी परीक्षेत यश मिळाले. पोलीस उपनिरीक्षक म्हणून मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत समाजासाठी चांगले काम करण्याचा प्रयत्न करणार आहे. या यशामागे आई–वडिलांचे कष्ट, कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी तेजस्विनी बोबडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवक–युवतींसाठी त्या प्रेरणास्थान ठरत आहेत.

श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या

# सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांचा यंग इनोव्हेटर्स विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत दुसरा क्रमांक




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जे.जे. सायन्स अकॅडमी आणि रोटरी क्लब मिडटाउन अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने संजोग लॉन्स येथे यंग इनोव्हेटर्स विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात एकूण १८७ सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांची सादरीकरणे केली. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामासाठी उपयुक्त असलेली मॅजिक स्टिक विद्यार्थ्यांनी तयार केली होती. या संघातील ईशान जाजू, मित वर्मा, थोर्वी गुंडेचा आणि साची कोठारी यांना २०,००० रुपये रोख पारितोषिकासह दुसरा क्रमांक मिळाला. सर्व १६ विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक विक्रम गणेशन यांनी उपक्रमांच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रयोग, चर्चा आणि सराव सत्रे घेण्यात आली. आयोजकांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी सर्व व्यवस्था अत्यंत सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली होती. हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या यशाने संघभावना, चिकाटी आणि सकारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाचालकांनी तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सौ गगन वधवा, सर्व समन्वयक यांनी कौतुक केले.

# एमआयडीसीत बोगस कचरा वेचकांच्या नावाखाली संशयितांचा वावर; चौकशीची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** एमआयडीसी व नागापूर परिसरात बोगस कचरा वेचक असल्याचे भासवत परप्रांतीय तसेच बाहेरून येणाऱ्या संशयित व्यक्तींचा वाढता वावर चिंतेचा विषय बनला असून, अशा व्यक्तींची सखोल चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत शिवाजी थोरात यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

यावेळी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांच्यासह शकुंतला वाघमारे, इंदुबाई कटे, शारदा फजगे, ताराबाई जगधने, मंगल चांदणे आदी एमआयडीसी व नागापूर परिसरातील स्थानिक कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे कचरा संकलनाचे काम करणाऱ्या स्थानिक कचरा वेचकांच्या सुरक्षेचा, सन्मानाचा आणि रोजगाराचा प्रश्न या निवेदनातून उपस्थित करण्यात आला.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित वातावरणात उपजीविका करण्याचा तसेच कायद्यापुढे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार दिला आहे. महाराष्ट्र पोलीस दल नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्हेगारीला आळा घालण्याचे महत्त्वाचे कार्य करत असल्याने या प्रकरणात निष्पक्ष चौकशीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

एमआयडीसी व नागापूर परिसरातील स्थानिक कचरा वेचक गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून रस्ते, कचरा कुंड्या, नाले आणि सार्वजनिक ठिकाणांवरील सुका कचरा गोळा करून उदरनिर्वाह करत आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यात त्यांचे मोलाचे योगदान असून त्यांच्या अनेक पिढ्या याच परिसरात वास्तव्यास आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्रासह सर्व आवश्यक शासकीय कागदपत्रे आहेत. इतक्या वर्षांच्या कामकाजात त्यांचा कोणत्याही गुन्हेगारी कृत्याशी संबंध आलेला नाही.

मात्र, गेल्या काही महिन्यांपासून काही परप्रांतीय तसेच श्रीरामपूरसह इतर भागांतून येणाऱ्या काही व्यक्ती कचरा वेचक असल्याचे भासवत हातात गोण्या घेऊन दिवसभर परिसरात फिरताना दिसत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे. स्थानिक नागरिकांकडूनही अशा व्यक्ती दिवसभर परिसराची पाहणी करून रात्री चोरी, लूटमार किंवा इतर बेकायदेशीर कृत्ये करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# आठ लाखांची ठेव अडकली; नैराश्यातून शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** आदर्श सहकारी नागरी पतसंस्थेतील तब्बल आठ लाख रुपयांची ठेव अनेक वर्षांपासून अडकून पडल्याने मानसिक तणावात असलेल्या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना पैठण तालुक्यातील गेवराई बुद्रुक येथे बुधवारी पहाटे उघडकीस आली. नाना भाऊसाहेब आगलावे (वय ५०, रा. गेवराई बुद्रुक, ता. पैठण) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

नाना आगलावे यांच्या मालकीची पांढरी–पिंपळगाव शिवारातील गट क्रमांक १३७ मध्ये सुमारे दोन हेक्टर ४० आर शेती होती. शेतीसोबतच ते गेवराई येथे किराणा दुकानही चालवत होते. कुटुंबाच्या भविष्यासाठी त्यांनी आडूळ येथील आदर्श सहकारी नागरी पतसंस्थेत सुमारे आठ लाख रुपयांची बचत गुंतवली होती. मात्र, पतसंस्थेतील कथित आर्थिक घोटाळा उघडकीस आल्यानंतर त्यांची संपूर्ण ठेव अडकली. अनेक प्रयत्न करूनही पैसे परत न मिळाल्याने ते गेल्या काही वर्षांपासून तीव्र मानसिक तणावाखाली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

बुधवारी पहाटे गावातील एका महिलेच्या निदर्शनास नाना आगलावे हे घरासमोरील लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. ग्रामस्थ व नातेवाईकांनी त्यांना तत्काळ पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीपन काळे यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व चार मुली असा परिवार आहे. या घटनेमुळे गेवराई बुद्रुक परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पतसंस्थेतील ठेवीदारांच्या प्रश्नाकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

# ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराविरोधात उपोषणाला पाठिंबा; आडूळगाव शंभर टक्के बंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सचिन चव्हाण यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून गुरुवारी सकाळपासून आडूळ गावात शंभर टक्के बंद पाळण्यात आला.

व्यापारी, व्यावसायिक आणि ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने व आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी ग्रामस्थांची प्रमुख मागणी आहे.



गावातील बंदमुळे बाजारपेठ शांत दिसून आली. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून, ग्रामस्थांनी आपल्या मागण्यांवर ठाम भूमिका कायम ठेवली आहे.

# शिवसेना नेते भाऊसाहेब गोरे यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिवसेनेचे (उबाठा) ज्येष्ठ नेते व माजी श्रीगोंदा तालुका प्रमुख भाऊसाहेब उर्फ अनशाबापू हिराजी गोरे (वय ८४ वर्षे) यांचे आज गुरुवार, दि. ०६/०८/२०२६ रोजी सकाळी ०७.४० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. कै. गोरे यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी पाच वाजता श्रीगोंदा येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै. गोरे यांच्या मागे सून, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीगोंदा येथील गर्व्हनमेंट कान्ट्रॅक्टर ईश्वर जंजिरे, वरिष्ठ पत्रकार अ‍ॅड. डॉ. बाळासाहेब बोठेपाटील व श्रीमती जयश्री गोरे यांचे ते सासरे, सौ. सुनीता जंजिरे व अ‍ॅड. सविता बोठेपाटील यांचे वडील तर सहायक पोलिस आयुक्त ( ) महेश ईश्वर जंजिरे, माध्यमतज्ज्ञ यश बाळासाहेब बोठेपाटील व युवा कार्यकर्ते जयराज राजकुमार गोरे यांचे ते आजोबा होत.



मुंबईत शिवसेनेचा जन्म झाला त्याच कालावधीत कै. भाऊसाहेब गोरे यांनी श्रीगोंदा येथे अत्यंत प्रतिकूल राजकीय परिस्थितीत शिवसेना स्थापन करण्यात महत्वाची भूमिका बजावली. काळाच्या ओघात आलेली अनेक आमिषे व विविध प्रकारच्या दबावाला न जुमानता त्यांनी शिवसेनेशी अखेरपर्यंत प्रामाणिक राहून सच्चा शिवसैनिक म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली. खुद्द शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या कामाची वेळोवेळी व्यक्तिशः दखल घेतली. त्यामुळेच ठाकरे घराण्याशी कै. भाऊसाहेब गोरे यांची अखेरच्या क्षणापर्यंत विशेष जवळीक होती.

## शब्दकोडे क्रमांक : २३



**आडवे शब्द :** १. स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड ४. धान्याचे भंडार ६. दररोज ८. राजवाडा ९. दुधावरील मलई १०. विकृत इच्छा १२.'* पाव ' एक प्रसिद्ध महाराष्ट्रीयन खाद्य १३.'*** नाईक' एक मराठी नायिका १४. बारीक - विरुद्ध १५. पती - मालवणीत १७. दरारा १८. चुकीचा १९.अबोला २२. झाडाचे मूळ २३. गरज २४. अंगुली २५. पावसाळ्यात ओरडतात ते जीव २७.पक्षी ३८. बेकायदेशीर रित्या पैसे पाठवण्याचा एक मार्ग ३०. युद्ध ३२. फुलातील पराग कण ३४ जुगारातील खेळी ३६. नवा ३७. त्रास ३८. रक्त ३९.एक ऋतू ४०.एक रास ४१. नाही- विरुद्ध ४२. संगीत सप्तकातील अखेरचा स्वर ४३. शौर्य ४४. महाराष्ट्र भूमीची खरी ओळख असलेली थोर मंडळी ४५. स्वत : स उच्चारून वापरला जाणारा स्वर ४६. मेळ ४७.एक प्राणी ४९.लीन ५०. देह ५१. नायक ५२. रसरशीत **उभे शब्द :** १ अयोध्येचा राजा २. तिखट विचारांचा ३. लग- उलट लिहा ४. आंब्याची बी ५. पाठवणी ६. हालत ७. दरवाजा ९. दक्ष ११. एक आणि पाव मिळून तयार होणारी संख्या १४. गुजरातमधील एक शहर १६. साल १९. शर्त २०. ताकदवान २१. खोचक वागणारा २९. भात रोपाची केलेली दुबार पेरणी ३१. सैन्याचे अन्न धान्य ३३. सैनिक ३५. वर्तुळ ३९.एक हिंदी सिने अभिनेता '* जोशी ' ४०. सखा ४१. स्वीकृती ४३. केसांचा टोप ४४. घरदार ४६. सोबत ४८ वेड

### शब्दकोडे क्रमांक : २२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | का | ळ | | ह | र | क | त | | पा | र | ध |
| पा | ठ | | द | वा | | ला | | पा | व | न | |
| ट | | वा | या | | शा | | चो | र | टा | | बै |
| | ता | डी | | वि | स | र | | वा | | चा | ल |
| पा | प | | व | त | न | | मा | | ढा | ल | |
| डा | | ह | ज | र | | को | ल | म | | ना | म |
| | बा | र | | क | पा | ट | | हा | व | | ढ |
| क | ळ | क | ळ | | ठ | | दा | न | | स | |
| ला | | त | | का | | मा | न | | म | म | ता |
| वं | श | | मा | य | ना | | व | ज | न | दा | र |
| त | ला | व | | ना | | ग | | ब | न | | का |
| | का | | चा | त | क | | पा | र | | क्रो | |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक


### फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत चुरशीच्या लढती



अहिल्यानगर - फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (दि. ४ ऑगस्ट) विविध वयोगटांतील सामने अत्यंत चुरशीचे आणि रंगतदार वातावरणात पार पडले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यांमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल, आर्मी पब्लिक स्कूल, श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि कैसर इंग्लिश मीडियम स्कूल यांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. तर मुलींच्या १६ वर्षांखालील गटातील सामना गोलशून्य बरोबरीत सुटला. सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील मुलांच्या गटात पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि ओएसीस इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यात सामना झाला. पोदार इंटरनॅशनल स्कूलकडून आयान अत्तार याने ११ व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर यशराज ठुबे याने २९ व्या मिनिटाला दुसरा गोल करत संघाची आघाडी भक्कम केली. उत्कृष्ट बचाव आणि प्रभावी आक्रमणाच्या जोरावर पोदार इंटरनॅशनल स्कूलने २-० अशा फरकाने विजय मिळवला.यानंतर १६ वर्षांखालील मुलांच्या गटातही पोदार इंटरनॅशनल स्कूलने ओएसीस इंग्लिश मिडीयम स्कूलवर २-० असा विजय मिळवत दुहेरी यश संपादन केले. या सामन्यात आर्यन साबळे याने दुसऱ्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला सुरुवातीपासूनच आघाडी मिळवून दिली. त्यानंतर त्याने ५० व्या मिनिटाला दुसरा गोल नोंदवत विजयावर शिक्कामोर्तब केले. मुलींच्या १६ वर्षांखालील गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ॲण्ड एस यांच्यात अत्यंत चुरशीचा सामना झाला. दोन्ही संघांनी आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले. संपूर्ण सामन्यात अनेक संधी निर्माण झाल्या, मात्र दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. त्यामुळे हा सामना ०-० अशा गोलशून्य बरोबरीत संपला. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ॲण्ड एस यांच्यात झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने एकतर्फी वर्चस्व राखले. आकाश चौहान याने दुसऱ्या हाफमध्ये ४० व ४७ व्या मिनिटाला प्रत्येकी एक गोल केला. अजय सांगळे याने ४३ व्या मिनिटाला एक गोल करत संघाच्या आघाडीत भर घातली. तर रुद्र कांबळे याने ४५ व ६० व्या मिनिटाला दोन गोल झळकावत संघाचा विजय निश्चित केला. आर्मी पब्लिक स्कूलने ५-० अशा मोठ्या फरकाने विजय मिळवत प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करू दिला नाही.दुपारच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल आणि आर्मी एमआयसी ॲण्ड एस यांच्यात पुन्हा एकदा रोमांचक सामना रंगला. पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांनी अनेक आक्रमणे केली, मात्र गोल करण्यात अपयश आले. अखेर प्रतिक शेळके याने ३१ व्या मिनिटाला निर्णायक गोल करत आर्मी पब्लिक स्कूलला आघाडी मिळवून दिली. हा गोल अखेरपर्यंत कायम राखत आर्मी पब्लिक स्कूलने १-० अशा फरकाने विजय मिळवला.१४ वर्षांखालील मुलांच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि कर्नल परब स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने आक्रमक खेळ करत ४-० अशा फरकाने एकहाती विजय मिळवला. साईदीप भगत याने ४ व्या मिनिटाला पहिला गोल करून संघाचे खाते उघडले आणि २४ व्या मिनिटाला दुसरा गोल नोंदवला. अर्श शेख याने २१ व्या मिनिटाला तर आर्या शिंदे याने ३८ व्या मिनिटाला गोल करत विजय अधिक दिमाखदार केला. कर्नल परब स्कूलला मात्र एकही गोल करता आला नाही.

### अकोळनेरचे माजी ग्रामपंचायत सदस्य भगवंतराव जाधव (बाप्पू) यांचे निधन

अहिल्यानगर- अकोळनेर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य



तसेच रयत शिक्षण संस्थेशी प्रदीर्घ काळ जोडलेले ज्येष्ठ समाजसेवक कै .भगवंतराव बळवंतराव जाधव (बापू) वय वर्ष ९१ यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने अकोळनेर व परिसरात शोककळा पसरली असून, एक अभ्यासू आणि लोकप्रिय नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांनी अकोळनेर ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून सलग २० वर्षे यशस्वीपणे काम पाहिले. केवळ राजकीय व सामाजिक क्षेत्रातच नव्हे, तर शिक्षण क्षेत्रातही त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या २५ ते ३० वर्षांच्या या प्रदीर्घ कार्यकाळामुळे त्यांनी परिसरात मोठा जनसंपर्क निर्माण केला होता. त्यांच्या पश्चात दोन मुली ,दोन मुलं , सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजचे मा .उपप्राचार्य प्रा. विलास जाधव व स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य कैलास जाधव यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# अहिल्यानगरात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनाचा ऐतिहासिक जल्लोष

**भव्य रॅली,पावरा नृत्य,लेझीम, सांस्कृतिक सोहळा । विशेष प्राविण्य सत्कार । सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार व समाजभूषण पुरस्कार आयोजन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आदिवासी अस्मिता, परंपरा, शौर्य, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा अभिमानाने गौरव करणारा जागतिक आदिवासी दिन यंदा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर शहरात अत्यंत उत्साहात व भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगर तथा सकल आदिवासी समाज, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० या वेळेत लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे भव्य आदिवासी एकता रॅली, सांस्कृतिक सोहळा,गुणवंत विद्यार्थी गौरव, सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार तसेच समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा आदिवासी समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

सकाळी १०.०० वाजता पारंपरिक आदिवासी वाद्यांचा दणदणाट,भगवे व आदिवासी ध्वज, घोषणांचा उत्साह आणि राजा हरिश्चंद्र लेझीम पथक (कोहणे, ता. अकोले)यांच्या जोशपूर्ण




सादरीकरणासह भव्य आदिवासी एकता रॅलीला प्रारंभ होईल.

रॅलीदरम्यान माळीवाडा स्टँड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच वाडिया पार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी लेझीम पथकाचे थरारक सादरीकरण आणि आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थिनींकडून पारंपरिक पावरा नृत्य सादर करण्यात येणार असून, हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

दुपारी सामूहिक भोजनानंतर मुख्य कार्यक्रमास प्रारंभ होईल. प्रा.डॉ.माहेश्वरी वीरसिंग गावित यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, आदिवासी समाजभूषण पुरस्कार वितरण, गुणवंत विद्यार्थी गौरव, सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन असे विविध उपक्रम पार पडतील.

या सोहळ्याच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा समृद्ध इतिहास,परंपरा,लोककला,संस्कृती, शौर्य आणि सामाजिक ऐक्याचा संदेश संपूर्ण शहरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, हा कार्यक्रम अहिल्यानगरच्या सांस्कृतिक इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, अहिल्यानगरचे अध्यक्ष मा.जगन्नाथ सावळे यांनी तमाम आदिवासी समाजबांधव, युवक–युवती, महिला, विद्यार्थी तसेच अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

डॉ.माहेश्वरी गावित म्हणाले,''ही रॅली केवळ मिरवणूक नसून आदिवासी अस्मिता, परंपरा, शौर्य, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा जिवंत उत्सव आहे. पारंपरिक लेझीम, पावरा नृत्य, आदिवासी वाद्यांचा निनाद, सांस्कृतिक वैभव आणि समाजाच्या एकोप्याचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबासह उपस्थित राहावे.''

विशेष म्हणजे, शहरातील तसेच शहराबाहेरील सर्व आदिवासी समाजबांधव, विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, युवक मंडळे, महिला मंडळे, कला–रसिक आणि सर्व नागरिकांनी या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होऊन आदिवासी संस्कृतीला बळ द्यावे, आपल्या परंपरेचा अभिमान जगासमोर मांडावा आणि या अभूतपूर्व एकात्मतेच्या पर्वाचे साक्षीदार व्हावे.असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगरमध्ये आदिवासी संस्कृतीचा रंग,परंपरेचा अभिमान आणि एकतेची ताकद अनुभवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आवर्जून उपस्थित राहावे.असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## दिलीपराव राजेभोसले यांची जिल्हा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** छत्रपती संभाजीनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी दिलीपराव राजेभोसले यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली.

दिलीपराव राजेभोसले यांनी यापूर्वी नांदर गावचे सरपंच, विविध सहकारी संस्थांचे चेअरमन, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अशी विविध जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

या निवडीबद्दल खासदार डॉ. कल्याण काळे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, ज्येष्ठ नेते प्रकाश मुगडिया, माजी आमदार नामदेव पवार, जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, तालुकाध्यक्ष रमेश मुळे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष संभाजी काटे, युवक काँग्रेस अध्यक्ष रवींद्र आम्ले, शहराध्यक्ष हास्नोदिन कटयारे, किशोर दसपुते, शेखर देशमुख, अशोक कापसे, लतिफ सय्यद, दीपक खानसे, सदानंद खडसान, अनिल मगरे, युनुस पठाण, निखील काळे, महेश देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जायकवाडीतून विसर्गाचे काटेकोर नियोजन; नदीपात्राबाहेर पाणी जाणार नाही – जयंत गवळी

**हारून शेख**
**दैनिक आकर्षण**

**पैठण –** जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडून गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यास बुधवारी प्रारंभ करण्यात आला. पूरस्थिती हाताळताना नदीपात्राबाहेर पाणी जाणार नाही, यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जाईल, असा विश्वास गोदावरी विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांनी व्यक्त केला.

धरणाच्या १८ दरवाज्यांचे पूजन करून विसर्गास सुरुवात करण्यात आल्यानंतर



सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने जयंत गवळी यांची भेट घेतली. मागील वर्षीच्या पुरामुळे पैठण शहर, गोदावरी तटावरील शेकडो एकर शेती, बाजारपेठ तसेच अनेक नागरिकांच्या घरांचे मोठे नुकसान झाल्याची आठवण करून देत यंदा पूरस्थिती टाळण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याची मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळाने धरण प्रशासनाने अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रणालीचा वापर करून पाण्याचे वैज्ञानिक नियोजन करावे आणि गोदावरी नदीपात्राबाहेर पाणी जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणीही केली.

# चिनच्या लि–सन यांची आदर्श गाव मांजरसुंबा येथे भेट; विकासकामांचे कौतुक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर एमआयडीसीतील जीकेन सिंटर मेटल्स कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथे वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी चीनमधून जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन यांनी विशेष उपस्थिती लावली. गावातील विकासकामे, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, शिक्षण आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागाची पाहणी करून त्यांनी मांजरसुंबा गावाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना लि–सन म्हणाले की, मांजरसुंबा गावात पर्यावरण संरक्षणासाठी होत असलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. या गावातील पर्यावरण संवर्धनाची बरोबरी चीनमधील अनेक प्रगत भागांशी करता येईल. येथे जाणवणारी सकारात्मक ऊर्जा चीनमधील काही विकसित गावांची आठवण करून देते. भारतात आल्यानंतर नेहमीच आनंद वाटतो. हिमालय पर्वतरांगांमुळे भारत आणि चीन यांच्यातील भौगोलिक अंतर मोठे असले तरी दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये अधिक सांस्कृतिक आणि सामाजिक संवाद वाढला पाहिजे. हा संपर्क केवळ राजकीय पातळीवर न राहता सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. गावातील महिलांचा सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग विशेष कौतुकास्पद असून जीकेन कंपनी केवळ उद्योग व्यवसायापुरती मर्यादित नसून समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्येही सातत्याने कार्यरत आहे. मांजरसुंबा गावाला भेट देऊन मनस्वी आनंद झाला असून पुन्हा या गावाला भेट देण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन, डायरेक्टर – इंडिया ऑपरेशन्स राजेश मीराणी, सरपंच रूपाली कदम, उपसरपंच जालिंदर कदम, डायरेक्टर – फायनान्स इंडिया सचिन असोले, डायरेक्टर – सेल्स सिद्धार्थ मित्रा, जनरल मॅनेजर सुधीर पोळ, प्लांट डायरेक्टर पुरुषोत्तम रिशी, डॉ. अभिजीत कुलकर्णी, सुनील राठी, बबन हिंगे, सिद्धार्थ भोसले, विठ्ठल हंडोरे, रमेश म्हस्के, मनोज गोरे, मिलिंद जपे, सोमनाथ ठोंबरे, ग्रामसेविका सारिका वाळुंज, विलास भुतकर, इंद्रभान कदम, चंद्रभान कदम, बाळासाहेब कदम, अक्षय कदम, गर्भगिरी शेतकरी महिला गट, शिव महिला गट तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजेश मीराणी म्हणाले की, जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि–सन यांनी मांजरसुंबा गावाला भेट देऊन येथील विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. शिक्षण, शेती, जलसंधारण आणि पर्यावरण संरक्षण क्षेत्रात गावाने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. जीकेन कंपनी रोजगार निर्मितीबरोबरच समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी या गावात झाली असून श्री गोरक्षनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीच्या विकासासाठी कंपनीचे सहकार्य भविष्यातही कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

उपसरपंच जालिंदर कदम यांनी सांगितले की, जीकेन कंपनी आणि मांजरसुंबा गाव यांचे कौटुंबिक व स्नेहाचे नाते निर्माण झाले आहे. कंपनीच्या सहकार्याने विविध विकासात्मक आणि पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. ग्रामस्थांच्या लोकसहभागामुळे शासनाच्या अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली असून विविध पुरस्कारांच्या माध्यमातून गावाला सुमारे ६० लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे पावसाचे पाणी अडविण्यात यश आले असून शेतकरी वर्षभर विविध पिके घेत असल्याने त्यांच्या

**युनिफाईट जिल्हा निवड चाचणीत नेप्तीच्या खेळाडूंची सुवर्णमयी कामगिरी**

# सुरेश कराटी अकॅडमीच्या खेळाडूंची पदकांची लयलूट; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युनिफाईट असोसिएशन, अहिल्यानगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या युनिफाईट जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत नेप्ती (ता. नगर) येथील सुरेश कराटी अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण पदकांची कमाई केली. उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, आत्मविश्वास आणि शिस्तबद्ध खेळाच्या जोरावर या खेळाडूंनी जिल्हास्तरावर आपले वर्चस्व सिद्ध केले. त्यांच्या या यशामुळे नेप्ती गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

जनता विद्यालय, काष्टी येथे नुकत्याच पार पडलेल्या या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत जिल्हाभरातील विविध कराटे व युनिफाईट प्रशिक्षण केंद्रांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या स्पर्धांमध्ये नेप्ती येथील सुरेश कराटी अकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या दमदार कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेत आयुष जाधव, शौर्य त्र्यंबके, मोहित जाधव, प्रथमेश वैराळ आणि गौरी त्र्यंबके यांनी सुवर्णपदक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तर गौरव त्र्यंबके याने रौप्यपदक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशस्वी खेळाडूंचा नेप्ती गावात सामाजिक कार्यकर्ते तसेच अहिल्यानगर जिल्हा सिलंबम असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष पै. नाना डोंगरे व नेप्ती विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक जालिंदर शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुरेश कदम, योगेश त्र्यंबके, कुमार त्र्यंबके, संदीप खामकर, सतीश पाचारणे, ह.भ.प. जपकर महाराज, शिवलिंग त्र्यंबके, खेळाडूंचे पालक, ग्रामस्थ आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, ग्रामीण भागात प्रचंड क्रीडा प्रतिभा दडलेली आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि पालकांचे सहकार्य मिळाल्यास हीच मुले राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करू शकतात. आज नेप्तीच्या खेळाडूंनी मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनतीचे, प्रशिक्षकांच्या अथक परिश्रमाचे आणि पालकांच्या विश्वासाचे फलित आहे. विजय हा केवळ पदकापुरता मर्यादित नसतो, तर तो शिस्त, संयम, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम यांची एकत्रित जोड असते. निरोगी व सुदृढ समाज घडविण्यासाठी युवकांनी मैदानी खेळाकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना प्रशिक्षक सुरेश जाधव आणि भारती पाचारणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# शिबिरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या जीवनात पुन्हा प्रकाश आला – ह.भ.प. गिरधारी डहाळे

**पार्वतीबाई सुखदेव वेताळ संस्थेच्या वतीने मिरीत ज्येष्ठांची मोफत नेत्रतपासणी । ४३ गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्थेच्या वतीने मिरी (ता. पाथर्डी) येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. संस्थेचे हे २६१ वे शिबिर असून, मागील २७ वर्षापासून हा उपक्रम सुरु आहे. मिरीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराच्या माध्यमातून ४३ गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदूच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, अनेकांना नवदृष्टी मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव पाहायला मिळाले.

या शिबिराचे उद्घाटन ह.भ.प. गिरधारी डहाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, दृष्टी म्हणजे जीवनाचा प्रकाश आहे. दृष्टी गेल्यानंतर माणसाचे जगणेच अंधारमय होते. अशा वेळी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या जीवनात पुन्हा प्रकाश



निर्माण करण्याचे पवित्र कार्य पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था सातत्याने करत आहे. ही सेवा म्हणजे केवळ आरोग्यसेवा नसून मानवतेची खरी उपासना असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवखेडे खालसाचे सरपंच चारुदत्त वाघ होते. त्यांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी शिबिराचा लाभ घेतला. ग्रामीण भागात अशा प्रकारचे आरोग्य उपक्रम अधिकाधिक राबविण्याची गरज असून, संस्थेच्या कार्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

शिबिराचे संयोजक मेजर शिवाजी वेताळ यांनी प्रस्ताविकात संस्थेच्या सामाजिक वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, ''समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविणे हे संस्थेचे ध्येय आहे. आजपर्यंत २६१ मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. हा केवळ आकडा नसून समाजसेवेप्रती असलेले सातत्य आणि रुग्णसेवेची बांधिलकी दर्शविणारा प्रवास आहे. भविष्यातही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अशाच प्रकारचे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिबिरादरम्यान मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीनंतर मोतीबिंदू झालेल्या रुग्णांची निवड करून त्यांना मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले होते. शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर हे सर्व रुग्ण नवदृष्टी मिळाल्याचा आनंद व्यक्त करत आपल्या गावी परतले. अनेकांनी संस्थेच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिबिर यशस्वी करण्यासाठी अनिता वेताळ यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच ग्रामस्थ, स्वयंसेवक आणि संस्थेच्या सदस्यांचे सहकार्य लाभले.

# अशोक गायकवाड यांच्या निधनामुळे ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा स्थगित

**जलदान विधी, सर्वपक्षीय शोकसभा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात ९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा आंबेडकरी चळवळीतील झुंजार, अभ्यासू व संघर्षशील नेतृत्व अशोक गायकवाड यांच्या आकस्मिक निधनामुळे स्थगित करण्यात आला आहे. समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय एकमुखाने घेण्यात आला.

बैठकीत ठरविण्यात आले की, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता अशोक गायकवाड यांच्या निवासस्थानी जलदान विधी पार पडणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता नगर–मनमाड रस्त्यावरील वृंदावन लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या शोकसभेला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्यासह राज्यातील विविध नेते उपस्थित राहणार आहेत. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार, खासदार, महानगरपालिका आयुक्त, सर्व नगरसेवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि समाजबांधवांना उपस्थित राहून अशोक गायकवाड यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रश्नावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात नियोजित मोर्चा पुढील महिन्यात अधिक व्यापक, संघटित आणि तीव्र स्वरूपात काढण्याचा निर्धार करण्यात आला. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत संविधान, सामाजिक न्याय आणि समतेच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांच्या वर एक डॉक्युमेंट्री करण्यात येणार आहे त्यासाठी त्यांच्या आंदोलनातील फोटो नगरसेवक सुरेश बनसोडे व सुमेध गायकवाड यांच्या कडे जमा करावे

बैठकीस नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील साळवे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, सुरेंद्र थोरात, सुनील शेत्रे, अजय साळवे, परिमल निकम, हर्षल गायकवाड, प्रा जयंत गायकवाड, नाथा अल्हाट, किरण दाभाडे, एन एम पवळे, निवृत्ती आरू, विजयराव भांबळ, महेश भोसले , मृणाल भिंगारदिव ,विलास साठे, प्रा एल बी जाधव, सिद्धार्थ आढाव, अमित काळे ,शनेश्वर पवार, दया गजभिये, महेंद्र राजगुरू, विजय गायकवाड, भाऊ भिंगारदिवे, विशाल कांबळे, विशाल गायकवाड , आप्पासाहेब मकासरे, विशाल भिंगारदिवे, प्रा भिमराव पगारे, कौशल गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, जयश्री गायकवाड, किरण गायकवाड, अविनाश भोसले, सिद्धांत गायकवाड, गणेश गायकवाड, पवन भिंगारदिवे, मयूर पाखरे, अजिंक्य भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, अक्षय भिंगारदिवे, प्रताप भिंगारदिवे, अजय पाखरे, सुरेश भिंगारदिवे ,सिद्धार्थ भिंगारदिवे, रवी कांबळे ,आकाश तांबे, अक्षय गायकवाड, सिद्धार्थ पवार , संदीप वाकचौरे आदीसह यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# एमआयडीसीचा ६४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**कृष्णाली व कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशनचा पुढाकार । रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव; 'गंध मराठी मातीचा' हा सांगीतिक कार्यक्रमात श्रोते मंत्रमुग्ध**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) च्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त एमआयडीसी प्रशासन तसेच कृष्णाली व कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये भव्य रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, 'गंध मराठी मातीचा' हा सांगीतिक कार्यक्रम तसेच प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांचे व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

औद्योगिक विकासाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत रक्तदान, शिक्षण, पर्यावरण, आरोग्य आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य सातत्याने राबविणासाठी एमआयडीसी यांच्यासह कृष्णाली व कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशनने योगदान देत आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. 'गंध मराठी मातीचा' या सांगीतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानातून मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि सामाजिक मूल्यांवर मार्गदर्शन करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड यांनी एमआयडीसीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या औद्योगिक प्रगतीचा आढावा घेत राज्याच्या विकासातील महामंडळाच्या योगदानावर प्रकाश टाकला. औद्योगिक विकासासोबत समाजाप्रती असलेली जबाबदारीही महत्त्वाची असल्याचे सांगत त्यांनी कृष्णाली व कृष्णप्रित वेलफेअर फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. ''फाउंडेशनने समाजहिताचे उपक्रम अशाच सातत्याने राबवावेत. एमआयडीसी प्रशासनाकडून भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य केले जाईल,'' असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या शिबिरासाठी जनकल्याण रक्तकेंद्र, अहिल्यानगर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, डॉ. प्रसाद इटकर, विलास मढीकर, शरद बळे, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा जोशी, सुलभा पवळ, तेजल हांडे तसेच वाहनचालक खुशाल खरमाळे यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी विशेष योगदान दिले.

याच कार्यक्रमात विविध शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, सरदार अनुसे (उप अभियंता, म.ओ.वि.म. विद्युत उपविभाग), श्री. संदीप बडगे (उप अभियंता, म.ओ.वि.म. स्थापत्य उपविभाग), कृष्णाली व कृष्णप्रीत वेल्फेअर फाउंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके, राहुल बळी, प्रवीण टेकाळे (क्षेत्र व्यवस्थापक), प्रदीप शिरसाठ, अमित गायकवाड, सेवानिवृत्त पांडुळे तसेच एमआयडीसीचे अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी डोंगरे व इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रियंका पाटील शेळके यांनी केले.

# श्री रामकृष्णमध्ये लेखांकन संग्रहालयाचे उद्घाटन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आयसीएआयच्या डब्लूआयआरसी (अहिल्यानगर शाखा) आणि (अहिल्यानगर) यांच्या संयुक्त विद्यमाने, अहिल्यानगर येथील श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनियर कॉलेजमध्ये लेखांकन संग्रहालयाचे उद्घाटन करण्यात आले.

अहिल्यानगरचे चेअरमन सीए अभय कुमार कटारिया व त्यांचे कार्यकारी मंडळ यांच्या प्रयत्नातून व पुढाकारातून हे संग्रहालय उभारण्यात आले. आयसीएआयच्याचे अध्यक्ष सौरभ अजमेरा यांच्या हस्ते या संग्रहालयाचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी च्या चे उपाध्यक्ष रिंकिन पटेल, सचिव बिशन शाह, खजिनदार राकेश शाह आणि चे अध्यक्ष राजेश अग्रवाल हे मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास स्कूल फाउंडेशनचे उपाध्यक्ष श्री. मोहनलाल मंधाना व श्री. राजेश झंवर, तसेच सहसचिव श्री. बजरंग दराक हे उपस्थित होते.

याप्रसंगी च्या चे अध्यक्ष सौरभ अजमेरा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला वाणिज्य शाखेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. भविष्यात प्रोफेशनला मिळणारे महत्त्व सांगितले.

अहिल्यानगरचे अध्यक्ष श्री अभय कुमार कटारिया यांनी अकाउंटिंग म्युझियम चे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष श्री मोहनलाल मानधना यांनी देखील विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेचे महत्त्व समजावून सांगितले. संस्थेचे अध्यक्ष श्री श्री गोपाल धूत ,शाळा समितीचे चेअरमन श्री नंदकुमार झंवर, संस्थेचे सचिव डॉक्टर शरद कोलते यांनी सीए इन्स्टिट्यूट ला धन्यवाद दिले.

शाळेत लेखांकन संग्रहालय उभारल्याबद्दल मुख्याध्यापिका श्री. गगन वाधवा यांनी च्या आणि चे मनः पूर्वक आभार मानले. हे संग्रहालय एक मौल्यवान शैक्षणिक साधन ठरून यामुळे लेखांकन क्षेत्राची व्याप्ती आणि त्याचा समृद्ध वारसा यांबाबतची समज वाढून विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांनाही याचा लाभ होईल असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत आनंद विद्यालयाची दमदार कामगिरी; पार्थ खेडकर चॅम्पियन ऑफ द चॅम्पियन




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या वतीने कल्याण रोड येथील द्वारका लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत आनंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. देशभरातील सुमारे २,५०० विद्यार्थ्यांच्या सहभागात पार पडलेल्या या पाच मिनिटांच्या स्पर्धेत आनंद विद्यालयाचा विद्यार्थी पार्थ भरत खेडकर याने तब्बल २३० गणिते अचूक सोडवत चॅम्पियन ऑफ द चॅम्पियन हा सर्वोच्च किताब पटकाविला. त्याला आकर्षक ट्रॉफी, प्रशस्तीपत्र आणि रोख तीन हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे, स्पर्धेच्या आजवरच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात अचूक गणिते सोडविण्याचा विक्रम नोंदविला गेला आहे.

याच स्पर्धेत अथर्व कैलास बाबर याने १७१ अचूक गणिते सोडवून चॅम्पियन होण्याचा मान मिळविला. तसेच शिवराज सचिन फाळके (१०३), विनिता महेश चिपोळे (९४), वेदांगी अभिजित भणगे (८१), रजत मयूर सुपेकर (७८), शिवांश गणेश शिंदे (७७), भूमिका भारत भवरे (७७), असद अन्सार पठाण (७२), सेजल रोहन बायस (६८), तनिष्का विनोद क्षीरसागर (५५), पवन सहदेव जांगिड (५२), विराज सनी जाधव (४६) आणि आयुष गोपाळ शिंदे (२६) यांनीही उल्लेखनीय कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्वल केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आनंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव किसन तरटे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र अष्टेकर यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी स्वाती ननावरे यांनी विद्यार्थ्यांनी अबॅकस प्रशिक्षणाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या यशामागे अबॅकस शिक्षिका नम्रता गांधी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन तातडीने जाहीर करा

**खेळाडू नोंदणीसाठी पुरेसा कालावधी द्यावा । अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाची मागणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शालेय क्रीडा स्पर्धा दरवर्षी जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या नियोजन प्रक्रियेनुसार आयोजित केल्या जातात. मात्र यंदा ऑगस्ट महिना सुरू होऊनही खेळाडू नोंदणी, स्पर्धांचे वेळापत्रक आणि आयोजनाबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने माध्यमिक शाळांतील क्रीडा शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी (डीएसओ) यांच्या पोर्टलद्वारे खेळाडूंची नोंदणी आणि स्पर्धांचे नियोजन केले जात होते. यंदा ही प्रक्रिया स्पोर्टस महाराष्ट्र विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र संबंधित संकेतस्थळ अद्याप कार्यान्वित नसल्यामुळे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली नाही.

नवीन प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थी खेळाडूसाठी पहिलीच्या जनरल रजिस्टरची प्रत, जन्मदाखला आणि आधार कार्ड ही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी खेळाडू असल्याने एवढ्या कमी कालावधीत सर्व कागदपत्रे संकलित करून स्कॅन करणे व ऑनलाइन अपलोड करणे हे अत्यंत जिकिरीचे आणि अशक्यप्राय काम ठरणार आहे.

स्पर्धांचे वेळापत्रक अचानक जाहीर झाल्यास शिक्षकांवर अतिरिक्त प्रशासकीय ताण येईल, तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने संकेतस्थळ सुरू करून खेळाडू नोंदणीसाठी पुरेसा कालावधी द्यावा, तसेच जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांचे वेळापत्रक आगाऊ जाहीर करावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने केली आहे.

# खरवंडी ते नवघन राजुरी १९८७ कमी–जास्त पत्रकानुसार परवानगी द्यावी – जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार ते नवगण राजुरी एन एच ३६१ एफ ००ते ११/५०० किमी दूतगती महामार्ग विस्तारिकरण व चौपदरी करणे या रस्त्याच्या चौकशी बाबत भारतीय मराठा महासंघ तालुका अध्यक्ष पाथर्डी अंबादास गंगाधर जगताप निवेदनाद्वारे मागणी केली आहे प्रांत अधिकारी तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहेकी मौजे खरवंडी तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथिल खरवंडी ते राजुरी एन एच३६१ दुतगती महामार्ग रस्ता याची ( अ ) आलेख पत्र व फेरमोजणी करण्यात यावी कारण सन १९८७ मध्ये मा. अप्पर जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेख अहिल्यानगर यांच्या आदेशान सदर रस्त्याचे कमी जास्त पत्रक वरून संपादीत केलेला असून त्या मधील रस्त्याच्या लगतचे शेतकरी यांची शेत जमीन किती गोली याचा स्पष्ट उल्लेख केला आहे मात्र दि . १६ / १२ २०१९ मध्ये परत फेर मोजणी करून ( अ )आलेख पत्र नकाशा तयार करण्यात आला नंतर दि.२५ ९/२०२२ रोजी दिव्य मराठी पेपर नगर टुडे या अंकात या प्रसिद्ध जाहीराती मध्ये शेतकरी यांचे सर्वे नंबर प्रसिध्द करण्यात आले परंतू क्षेत्र काही शेतकर्याचे कमी व काही जास्त रस्त्यामध्ये शेतजमीन जात नसताना दाखवण्यात आले सन १९८७ मध्ये कमी जास्त पत्रक दाखवण्यात आले त्याच प्रमाणात व नंतर काही शेतकऱ्याचे कमी व काही शेतकऱ्याचे रस्त्या मध्ये शेत जमीन जात नसताना दाखण्यात आले आहेत १९८७ मध्ये असलेल कमि जास्त पत्रक व प्रसिद्ध केलेली जाहीरात राजपत्र त्यात शेतकऱ्यांची खुप मोठी तफावत आहे १९८७ मध्ये जी जमीन गेली फेरफार नंबर ९१०१ मध्ये खुप मोठी तफावत आहे तरी शेतकरी यांची शेत जमीन सन१९८७ दि १५/१० १९८७ मध्ये कमी जास्त पत्रक मध्ये रस्ता संपादित केल्या प्रमाणे करावी रस्त्याच्या लगतचे शेतकरी यांची फेर मोजणी करून न्याय दयावा अशि मागणी जगताप यांनी प्रांताधिकारी तहसिलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे सदर प्रत आमदार मोनिकाताई राजळे (पाथर्डी – शेवगाव ) मा. राष्ट्रीय अध्यक्ष भारतीय मराठा महासंघ जिल्हा अध्यक्ष भारतीय मराठा महासंघ पत्रकार यांना सादर केला आहे



(पान १ वरून)

## तोफखाना व एमआयडीसी हद्दीतील मावा व सुगंधी तंबाखूवर एलसीबीची धाड

(रा. मुकुंदनगर – फरार), अक्षय कुंडलिक निकाळजे (वय २९, रा. बोल्हेगाव) व अस्लम शेख (रा. माळीवाडा– फरार).अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांचे विशेष पथक तयार करून दिनांक ६ रोजी ही कारवाई केली.

## जिल्ह्यात अवैध धंद्यांवर एलसीबीची धडक कारवाई

पोनि. मुटकुळे यांनी पथकाची चार विशेष पथके तयार केली. या पथकांनी ५ ऑगस्ट रोजी विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी छापे टाकले. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध धंदेवाईकांचे धाबे दणाणले आहे. यापुढेही बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध अशीच कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. पोलीस ठाणेनिहाय कारवाई आणि जप्त मुद्देमाल:

– दारू विक्री विरोधी कारवाई:–

जामखेड: २ गुन्हे (मुद्देमाल: १ लाख ६० हजार) सुपा: २ गुन्हे (मुद्देमाल: ११ हजार ६३०) एमआयडीसी: ३ गुन्हे (मुद्देमाल: १२ हजार ६४०) तोफखाना: १ गुन्हा (मुद्देमाल:२ हजार)

अवैध जुगार कारवाई

तोफखाना: १ गुन्हा (मुद्देमाल: २ हजार २९०)

– मावा / सुगंधी तंबाखू जप्ती:–

जामखेड: १ गुन्हा (मुद्देमाल: १ लाख ८ हजार ७००)

## जादा परताव्याच्या आमिषाने गुंतवणूकदारांची फसवणूक, पुणे विमानतळावरून जोडपे ताब्यात

आरोपींनी रिजॉईस इव्हेन्ट ऑर्गनायजर कंपनीचा व्यवसाय वाढवण्याच्या बहाण्याने तक्रारदार योगी महेंद्र सबलोक (रा. अहिल्यानगर) व इतर नागरिकांकडून मोठी रक्कम उकळली होती. सुरुवातीला लाभांश देण्याचे भासवून नंतर परतावा न देता विश्वासघात केला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते.

## उद्योजकांच्या प्रत्येक प्रश्नावर तातडीने कारवाई होईल - डॉ. पंकजा आशिया

लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर उत्तर देताना जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया म्हणाले उद्योग क्षेत्राच्या अडचणी प्राधान्याने सोडविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. उद्योजकांना मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधून तातडीने निर्णय घेतले जातील. कोणताही प्रश्न केवळ कागदावर राहणार नाही, तर त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही होईल.

ते पुढे म्हणाले की, नवीन सबस्टेशन उभारण्यास काही कालावधी लागणार असला तरी आहेत त्या सबस्टेशनमध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसवून वीज क्षमतेत वाढ करण्याचा प्रस्ताव तातडीने पुढे नेण्यात येईल. सीएनजी गॅस मीटर उपलब्धतेबाबतही संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून लवकरात लवकर मार्ग काढला जाईल.कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर त्यांनी अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना देत, ज्या ठिकाणी कचरा साचला आहे किंवा सांडपाणी तुंबले आहे त्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. संबंधित विभागांना तातडीने स्वच्छता मोहीम राबविणे, कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि जबाबदार यंत्रणांवर आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

ईएसआयसी रुग्णालयाच्या प्रश्नाबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांशी पाठपुरावा करून हा विषय शासन स्तरावर प्रभावीपणे मांडण्याचे आश्वासन दिले. बैठकीच्या शेवटी डॉ. पंकजा आशिया यांनी प्रशासन आणि उद्योग क्षेत्र यांच्यात सातत्याने संवाद राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. उद्योग वाढले तर रोजगार वाढेल आणि जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल. त्यामुळे उद्योजकांच्या रास्त मागण्यांवर प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रवीण जुंद्रे, सतीश गवळी, सागर निंबाळकर, सुमित सोनवणे, प्रकाश गांधी, सचिन पाठक, अमोल घोलप, गणेश कोलार, संजय बंदिष्टी, अनिल लोढा, मिलिंद कुलकर्णी, पुरुषोत्तम नावंदर, संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लक्ष्मी यात्रा उत्सवाची पोतराजासह शहरात रंगली मिरवणूक

विशेष आकर्षण ठरतो. दरम्यान, यात्रेच्या आदल्या दिवशी पाचारणे कुटुंबीयांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला होता. या भंडाऱ्यालाही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.